शुक्रवार

सोलापूर

०४

सप्टेंबर २०२६

पाने- ४
अंक - १४
वर्ष - १
किंमत ५ रुपये

epaper.loksahityamarathi.com

www.loksahityamarathi.com

RNI NO. MHMAR/26/A4021

साप्ताहिक

लोक साहित्य

उल्लंघनावरून

बापट यांना गणेशोत्सवासंदर्भात आयोजित बैठकीतून ज्या प्रकारे बाहेर जावे लागले, त्यावरून खुद्द पुण्यातही अनेक तीव्र प्रतिक्रिया उमटल्या, उमटताहेत. ही बैठक होती पुणे महापालिकेचे पदाधिकारी, पोलीस प्रशासन आणि गणेश मंडळांचे कार्यकर्ते यांची. बापट या बैठकीत सामान्य पुणेकर म्हणून सहभागी झाले. चर्चेदरम्यान त्यांनी फक्त इतकेच सांगितले, की कानाचा पडदा फाटेपर्यंत आवाज करणारे ध्वनिवर्धक आणि नंतर ढोल–ताशे वाजविणे बंद करा, त्याचा आम्हा नागरिकांना खूप त्रास होतो. त्यावरून त्यांना थेट बाहेरचा रस्ता दाखविला गेला. त्यांना अशी वागणूक देणार्या हुल्लडबाजांवर कारवाई करण्याच्या सूचना आता खुद्द राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत. म्हणजे हे औचित्याला धरून झालेले नाही, असेही त्यांनी या बैठकीला उपस्थित असलेल्या त्यांच्या पक्षाच्या नेते, कार्यकर्त्यांना अप्रत्यक्ष सुनावले आहे. त्यासाठी त्यांचे अभिनंदनच करायला हवे. मात्र, ते करताना बापट जो ध्वनिमर्यादेच्या उल्लंघनाचा आणि त्यावर पूर्णपणे बंदी घालण्याचा मुद्दा मांडू पाहत होते, तो बासनात गुंडाळला जाणार नाही, याचे विस्मरण न होणेही महत्त्वाचे.

त्यावर, सध्या दिसते ते असे, की ध्वनिमर्यादेच्या उल्लंघनावरून सुरू असलेला जनतेचा आक्रोश ऐकून वेगवेगळ्या शहरांतील सर्वच राजकीय पक्षांचे नेते सावध प्रतिक्रिया देत आहेत. ‘उत्सवाला नियमावली हवी, पण सरसकट निर्बंध नकोत,’ ही भूमिका त्यातूनच येते. हे म्हणजे अप्रत्यक्षपणे, ‘नियम करा, पण ते करताना त्यात पळवाटाही ठेवा,’ असे सांगण्यासारखे आहे. उत्सव, मग तो कुणाचाही वा कोणताही असो, सार्वजनिकपणे साजरा करताना त्यात गोंगाट, रस्ते अडवणूक, बेफामपणा होणार नाही, असे कुणीच स्पष्टपणे सांगत नाही.

वास्तविक शहरांमधील सर्वपक्षीय स्थानिक नेते हे त्या–त्या शहरातील वेगवेगळ्या भागांतील मंडळांचे, सामाजिक संस्थांचे अध्यक्ष किंवा पदाधिकारी आहेत. त्यांना आपल्या कार्यकर्त्यांना हे सांगणे इतके का जड जावे? त्याऐवजी भाषा ऐकू येते, ती आधी ‘अमुक एकांना’ नियम पाळायला सांगा, मग ‘आमच्या’वर आक्षेप घ्या. लोकांना त्रास होणार नाही, अशाही प्रकारे सार्वजनिक उत्सव साजरा करता येतो, याचा असा आदर्श ‘आम्ही’ घालून देऊ, की इतरही त्याचे अनुकरण करू शकतील, अशी समन्वयाची भाषा का कधीच ऐकू येत नाही? सर्वसामान्यांना पडणार्या या प्रश्नाचे उत्तर कधीच मिळत नाही.

मुंबईतील बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी फटाके, ध्वनिवर्धक, डीजे वापरात नियमभंग करणार्यांवर कठोर कारवाईचे आदेश दिले, प्रसादासंदर्भात अन्न व औषध प्रशासनाच्या नियमांचे काटेकोर पालन करा, अशीही सूचना केली. वास्तविक असे आदेश, सूचना दर वर्षी दिल्या जातात, पण त्यांचे पालन होते का? समजा प्रशासनाने पालन करायचे ठरवले, तर त्यात राजकीय हस्तक्षेप होऊन कारवाई टाळली जाते का? केवळ निवडक कारवाई होते, सरसकट होत नाही, असे होते का? या आणि अशा प्रश्नांची उत्तरे एव्हाना सर्वसामान्य नागरिकांना पाठ झाली आहेत. त्यामुळे त्यांची उजळणी करण्याची गरज नाही. काही नागरिक तर ही उजळणी दर वर्षी करायला लागू नये, म्हणून शहरांतून बाहेरगावी निघून जातात, हेही आता नवीन नाही.

कर्कशतेचेच उदाहरण द्यायचे, तर पुण्यामध्ये पोलिसांनी सुरू केलेल्या एका विशेष कक्षाकडे गेल्या आठ महिन्यांत ध्वनिप्रदूषणाच्या १४ हजार तक्रारी आल्या आहेत. हे प्रातिनिधिक. मुंबई, नागपूर, ठाणे वा इतर शहरांतही ध्वनिप्रदूषण ही समस्या आहेच. ध्वनिकल्लोळाचा हा त्रास नागरिकांना पूर्ण वर्षभर होत असल्याचा हा दाखला. अचानक मध्यरात्री फटाके वाजणे, ध्वनिवर्धकांनी कानाचे पडदे फाडणे, सरावाच्या नावाखाली महिना–दोन महिने निवासी संकुलांशेजारी ढोल–ताशे बडवत राहणे, असे अनुभव नागरिक घेत असतातच. शिवाय, त्यात दिवसभर बांधकामे, खोदकामे, विकासकामे, वाहनांचे हॉर्न यांचे आवाज. आता तर तंत्रज्ञानाच्या प्रगतीने निर्माण केलेली प्रेशर मिड, प्लाझ्मा अशी उपकरणे ध्वनिवर्धक यंत्रणांना आणखी कित्येक पटींनी आवाजी बनवतात. गोंगाट सहन करण्याची ६० ते ८० डेसिबलची मानवी क्षमता त्यांनी कधीच पार केली आहे. त्यामुळे हे आवाज बहिरेपणाच्या पुढे जाऊन हृदयविकाराच्या झटक्याने होणार्या मृत्यूलाही कारणीभूत ठरतात. मुद्दा असा आहे, की स्वत:ला लोकनेते म्हणवणार्यांकडे हे मुद्दे ऐकायला वेळ आहे का? की त्यांनीही त्यांचे कार्यकर्ते खूश राहावेत, म्हणून ‘डीजे’च्या आवाजाचे पांघरूण कानावर घालून त्याकडे दुर्लक्ष केले आहे? मध्यंतरी सोलापूर शहराने ‘डीजे’वर बंदी आणली, तसा विचार त्याच पक्षाच्या इतर शहरांतील सत्ताधार्यांना का सुचत नाही?

बेभान वागण्याची सूट मिळविणे म्हणजे परंपरा राखणे नसते. परंपरांचेच दाखले द्यायचे, तर सार्वजनिक उत्सव यशस्वीपणे साजरे होत असल्याची उदाहरणे आहेतच. गणेशोत्सवात पूर्वी भरणारे मेळे, भावसंगीत, शास्त्रीय संगीतांच्या मैफलींपासून हिंदी गाण्यांचेही होणारे कार्यक्रम, नाटके, स्पर्धा यात सार्वत्रिक भरपूर लोकसहभाग असायचा. हा लोकसहभागच सार्वजनिक उत्सव यशस्वी करत असतो. आजही पुण्या–मुंबईसारख्या शहरांत प्रामुख्याने गृहनिर्माण सोसायट्या, चाळी, वाडे येथे ही उपक्रमशीलता दिसते. मंडळांचे विविध सामाजिक–राजकीय विषयांवरचे, पौराणिक, ऐतिहासिक कथांवरचे देखावे हे आजही लोकांचे आकर्षण आहे. हे देखावे आणि विसर्जन मिरवणूक अनुभवायला देश–विदेशांतून लोक येतात. या उपक्रमांत असलेले सर्जनशील वैविध्य, सातत्य आणि त्यासाठी झटणार्या कार्यकर्त्यांच्या परिश्रमाला सलामच.

गणेशोत्सवाला राज्य सरकारने ‘राज्योत्सवा’चा दर्जा दिला असताना, हे सगळे उपक्रम आणि त्यात जपले जाणारे हे सामाजिक भान, हे जागतिक स्तरावर ठळकपणे उमटायला हवे आहे. मात्र, विशेषत: गेल्या दोन–अडीच दशकांत नियम उल्लंघनामुळे सगळ्याच उत्सवांत आलेली कर्कशता लोकांना त्रासदायक ठरते आहे. निर्बंधमुक्तीचा अर्थ उत्सवाच्या निमित्ताने होत असलेल्या अभिव्यक्तीला दिलेली मोकळीक.

उपोषणाची प्रशासनाकडून दखल

तिसंगी (सोनके) तलाव १०० टक्के भरण्याचे आश्वासन

पंढरपूर : तिसंगी (सोनके) तलाव भरण्याच्या मागणीसाठी तिसंगी इनलेट येथे सुरू असलेल्या उपोषणाची प्रशासनाने दखल घेतली आहे. उपोषणस्थळी उजनी कालवा विभाग, फलटणचे कार्यकारी अभियंता यांनी भेट देऊन उपोषणकर्त्यांशी चर्चा केली. यावेळी तलाव भरण्याच्या मागणीवर प्रशासनाकडून सकारात्मक भूमिका घेण्यात आली असून, तिसंगी (सोनके) तलाव १५ ऑक्टोबर २०२६ पर्यंत १०० टक्के भरून देण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले. तिसंगी (सोनके) तलावात पाणी सोडण्याच्या मागणीसाठी दि. ३१ ऑगस्ट २०२६ पासून उपोषण सुरू करण्यात आले होते. तलावात पाणी सोडण्याची मागणी करत आंदोलनकर्त्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले होते. दरम्यान, उपोषणस्थळी अधिकारी, संबंधित पदाधिकारी व ग्रामस्थांची उपस्थिती राहिली. यावेळी तलावातील पाण्याच्या उपलब्धतेसह पाणी सोडण्याच्या नियोजनाबाबत चर्चा करण्यात आली. प्रशासनाने दिलेल्या लेखी पत्रानुसार, दि. ३ सप्टेंबर २०२६ पासून तिसंगी (सोनके) तलावात पाणी सोडण्यात आले आहे. तसेच लाभक्षेत्रात समाधानकारक पाऊस झाल्यानंतर उपलब्ध पाण्यानुसार तलाव १०० टक्के भरून देण्यात येईल, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. उपोषणस्थळी झालेल्या चर्चेदरम्यान प्रशासनाने दिलेल्या आश्वासनामुळे आंदोलनकर्त्यांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याचे चित्र आहे. तलावात पाणी सोडण्याची प्रत्यक्ष कार्यवाही सुरू झाल्याने परिसरातील शेतकरी व ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान, प्रशासनाने तिसंगी (सोनके) इनलेटजवळ सुरू असलेले उपोषण स्थगित करावे, अशी विनंतीही केली आहे. यासंदर्भातील पत्रशेतकरी नेते समाधान फाटे , श्री. तानाजी गोफणे, श्री. शतोष गचकवाड आणि श्री. वाद्यमारे यांना उद्देशून देण्यात आले आहे. आता प्रशासनाने दिलेल्या आश्वासनानुसार तिसंगी (सोनके) तलाव १०० टक्के भरला जातो का, तसेच या आश्वासनानंतर उपोषणकर्ते आंदोलन स्थगित करणार की पुढील भूमिका घेणार, याकडे परिसरातील शेतकरी आणि ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

रोजच्या रोज सकाळीच होईल पोट साफ

बद्धकोष्ठता ही केवळ एक सामान्य समस्या नसून, तुमची पचनसंस्था व्यवस्थित काम करत नसल्याचा शरीराकडून मिळणारा तो एक संकेत असू शकतो. जेव्हा शौच खूप कडक किंवा कोरडे होते, शौचास जास्त जोर लावावा लागतो आणि शौच केल्यानंतरही पोट पूर्णपणे साफ न झाल्याची भावना राहते, तेव्हा त्याला बद्धकोष्ठता म्हणतात. बद्धकोष्ठतेमागे अनेक कारणे असू शकतात. आहारात फायबरची कमतरता, पुरेसे पाणी न पिणे, शारीरिक हालचालींचा अभाव, काही औषधांचे दुष्परिणाम तसेच वाढत्या वयानुसार चयापचय आणि आतड्यांच्या हालचालींमध्ये होणारी घट, यामुळे बद्धकोष्ठतेची समस्या उद्भवू शकते.

बद्धकोष्ठता झाल्यानंतर शरीरात काही विशिष्ट लक्षणे दिसू लागतात. आठवड्यातून तीनपेक्षा कमी वेळा शौचास होणे, शौच खूप कडक, कोरडे किंवा गोळ्यांसारखे होणे, शौचाच्या वेळी जास्त जोर लावावा लागणे, पोटात सतत जडपणा जाणवणे, गॅस होणे, पोट फुगणे आणि शौच पूर्णपणे न झाल्यासारखे वाटणे ही त्यापैकी काही सामान्य लक्षणे आहेत. काही लोकांमध्ये जिभेवर थर जाणवणे किंवा तोंडाला दुर्गंधी येणे यांसारख्या तक्रारीही दिसून येऊ शकतात; मात्र ही लक्षणे केवळ बद्धकोष्ठतेमुळेच होतात असे नाही.

बद्धकोष्ठतेची समस्या दीर्घकाळ राहिल्यास शौचाच्या वेळी वारंवार जोर लावल्यामुळे मूळव्याध किंवा गुदद्वाराला भेग पडण्यासारख्या समस्या निर्माण होऊ शकतात. काही वेळा दीर्घकाळ बद्धकोष्ठता आणि त्यामागील कारणांकडे दुर्लक्ष केल्यास पचनसंस्थेशी संबंधित इतर त्रासही वाढू शकतात. विशेषतः वय वाढल्यानंतर आहार, पाणी, व्यायाम आणि औषधांचा परिणाम याकडे अधिक लक्ष देणे गरजेचे असते.

बद्धकोष्ठतेपासून आराम मिळवण्यासाठी आहार आणि जीवनशैलीमध्ये काही बदल करणे फायदेशीर ठरू शकते. सकाळी उठल्यानंतर पुरेसे पाणी पिणे, आहारात फायबरयुक्त पदार्थांचा समावेश करणे, कोंडा असलेले किंवा संपूर्ण धान्याचे पीठ वापरणे, नियमित शारीरिक हालचाल करणे आणि शौचाची इच्छा झाल्यानंतर ती टाळू नये, यामुळे आतड्यांची हालचाल नियमित ठेवण्यास मदत होऊ शकते. काही लोक त्रिफळा किंवा इसबगोलसारख्या नैसर्गिक रेचकांचा वापर करतात; मात्र त्यांचा नियमित किंवा दीर्घकाळ वापर करण्यापूर्वी डॉक्टरांचा किंवा तज्ज्ञांचा सल्ला घेणे योग्य ठरते.

आयुर्वेदिक आणि युनानी औषधशास्त्रातील तज्ज्ञ डॉ. सलीम झैदी यांच्या मते, बद्धकोष्ठतेवर मात करण्यासाठी आहारामध्ये नैसर्गिक आणि फायबरयुक्त पदार्थांचा समावेश करणे महत्त्वाचे आहे. काही फळांमध्ये भरपूर फायबर, पाणी आणि नैसर्गिक घटक असतात, जे आतड्यांची हालचाल सुरळीत ठेवण्यास आणि शौच मऊ करण्यास मदत करू शकतात, त्यामुळे बद्धकोष्ठतेची समस्या असणाऱ्या व्यक्तींनी आपल्या आहारात काही फळांचा योग्य प्रमाणात समावेश करण्याचा विचार करू शकतात.

चला तर मग जाणून घेऊया, बद्धकोष्ठतेच्या समस्येमध्ये कोणती फळे फायदेशीर ठरू शकतात आणि त्यांचे सेवन कशा प्रकारे करता येईल.

१. पपई : पचनासाठी फायदेशीर फळ

पचनसंस्थेसाठी पपई हे एक फायदेशीर फळ मानले जाते. पपईमध्ये ‘पपेन’ नावाचे एन्झाइम असते, जे प्रथिनांच्या पचनास मदत करते. याशिवाय पपईमध्ये फायबर आणि पाण्याचे प्रमाणही चांगले असते, त्यामुळे आतड्यांची हालचाल सुरळीत ठेवण्यास आणि शौचास मऊ होण्यास मदत होऊ शकते.

पिकलेली पपई आहारात नियमितपणे योग्य प्रमाणात घेतल्यास बद्धकोष्ठता, पोट फुगणे आणि पचनाशी संबंधित काही तक्रारी कमी करण्यास मदत होऊ शकते. सकाळी नाश्त्यासोबत किंवा दिवसभरातील इतर वेळी पपईचे सेवन करता येते. मात्र, पपई रिकाम्या पोटीच खावी असा वैद्यकीय नियम नाही.

२. मनुका आणि सुके आलुबुखारे : नैसर्गिकरीत्या शौच मऊ करण्यास मदत

बद्धकोष्ठतेवर आहारातून उपाय करताना मनुका आणि सुके आलुबुखारे म्हणजेच प्रून्स यांचा उपयोग केला जातो. विशेषतः सुक्या आलुबुखाऱ्यामध्ये ‘सॉर्बिटॉल’ नावाची नैसर्गिक साखर असते. सॉर्बिटॉल आतड्यांमध्ये पाणी खेचण्यास मदत करू शकते, ज्यामुळे शौच मऊ होण्यास आणि सहज बाहेर पडण्यास मदत मिळते.

यामध्ये फायबरदेखील असते, त्यामुळे आतड्यांच्या हालचालींना चालना मिळण्यास मदत होऊ शकते. काही लोक ३ ते ५ सुके आलुबुखारे रात्रभर पाण्यात भिजवून सकाळी खातात. मनुकाही पाण्यात भिजवून खाता येतात. मात्र, प्रत्येक व्यक्तीची पचनशक्ती वेगळी असल्याने सुरुवातीला कमी प्रमाणात सेवन करणे योग्य ठरते.

३. किवी : फायबरमुळे पचनासाठी उपयुक्त

किवी हे आकाराने छोटे असले तरी पोषक घटकांनी समृद्ध फळ आहे. त्यामध्ये फायबर आणि पाण्याचे प्रमाण चांगले असते. किवीमध्ये ‘ॲक्टिनिडिन’ नावाचे एन्झाइम आढळते, जे विशेषतः प्रथिनांच्या पचनास मदत करू शकते.

किवीमध्ये असलेल्या फायबरमुळे आतड्यांची हालचाल नियमित ठेवण्यास आणि शौच मऊ होण्यास मदत होऊ शकते, त्यामुळे बद्धकोष्ठता, पोट फुगणे आणि पोटात जडपणा जाणवणाऱ्या काही व्यक्तींना किवीचा आहारात समावेश फायदेशीर ठरू शकतो. दररोज एक ते दोन किवी योग्य प्रमाणात खाता येऊ शकतात; मात्र आपल्या आहाराची एकूण रचना आणि शरीराची सहनशीलता लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.

४. अंजीर : फायबरचा उत्तम स्रोत

अंजीर हे फायबरयुक्त फळ असून बद्धकोष्ठतेच्या समस्येमध्ये आहाराचा भाग म्हणून त्याचा उपयोग केला जातो. अंजीरमध्ये विद्राव्य आणि अविद्राव्य अशा दोन्ही प्रकारचे फायबर आढळते. हे फायबर आतड्यांच्या हालचालींना मदत करते आणि शौचाचे प्रमाण व पोत सुधारण्यास हातभार लावू शकते.

सुक्या अंजीरमध्ये नैसर्गिक साखर आणि फायबरचे प्रमाण अधिक असते, त्यामुळे काही लोक २ ते ४ सुके अंजीर रात्रभर पाण्यात भिजवून सकाळी खातात. अंजीर भिजवल्यामुळे ते मऊ होतात आणि खाण्यास सोपे जातात. मात्र, सुक्या फळांमध्ये नैसर्गिक साखरेचे प्रमाण तुलनेने जास्त असल्याने प्रमाणात सेवन करणे योग्य आहे.

५. नाशपाती : सालीसकट खाल्ल्यास अधिक फायबर

नाशपाती हे फायबर आणि पाण्याने समृद्ध फळ आहे. त्यामध्ये विद्राव्य तसेच अविद्राव्य फायबर आढळते, त्यामुळे आतड्यांची हालचाल नियमित ठेवण्यास आणि शौचास सहज होण्यास मदत मिळू शकते.

बद्धकोष्ठता टाळण्यासाठी या गोष्टीही लक्षात ठेवा

फक्त एखादे फळ खाल्ल्याने बद्धकोष्ठतेची समस्या कायमची दूर होईलच असे नाही. त्यासाठी संपूर्ण आहार आणि जीवनशैलीकडे लक्ष देणे गरजेचे आहे. दिवसभर पुरेसे पाणी पिणे, डाळी, कडधान्ये, भाज्या, संपूर्ण धान्ये आणि फळांसारख्या फायबरयुक्त पदार्थांचा आहारात समावेश करणे, नियमित चालणे किंवा व्यायाम करणे आणि शौचाची इच्छा दाबून न ठेवणे या सवयी महत्त्वाच्या आहेत.

फायबरचे प्रमाण आहारात अचानक मोठ्या प्रमाणात वाढवण्याऐवजी ते हळूहळू वाढवणे आणि त्यासोबत पुरेसे पाणी पिणे आवश्यक आहे, अन्यथा काही लोकांमध्ये गॅस किंवा पोट फुगण्याची समस्या वाढू शकते.

जर बद्धकोष्ठतेची समस्या वारंवार होत असेल, अनेक आठवडे कायम राहत असेल किंवा त्यासोबत शौचातून रक्त येणे, अचानक वजन कमी होणे, सतत तीव्र पोटदुखी, उलट्या होणे, पोट खूप फुगणे किंवा शौच पूर्णपणे बंद होणे यांसारखी लक्षणे दिसत असतील तर स्वतःहून उपचार न करता डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

लोकसाहित्य हे पत्र मालक, प्रकाशक व संपादक नागेश एकनाथ फाटे यांचे करिता प्रसाद संजय पवार, राजस्व प्रिंटिंग प्रेस, बुधवार पेठ, वडार गल्ली, सोलापूर, जि.सोलापूर ४१३००२ येथे मुद्रित केले व गादेगाव,पंढरपूर, सोलापूर, महाराष्ट्र – ४१३३०४. येथे प्रकाशित केले. संपर्का साठी : मो. ९८५०१ २९३५५, इमेल – loksahityamarathi24@gmail.com (या अंकातील सर्व मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. पंढरपूर न्यायकक्षेत)

Printed by Prasad Sanjay Pawar at Rajswa Printing Press, Budhwar Peth, Wadar Galli, Solapur, Dist. Solapur 413002, for the owner, publisher and editor NAGESH EKNATH PHATE, published at GADEGAON, PANDHARPUR, SOLAPUR, MAHARASHTRA - 413304.. RNI No. – MHMAR/26/A4021

वसंतदादांचा विचार, कल्याणराव साहेबांची कृतीशील वाटचाल

समाजसेवेचा वसा जपणाऱ्या नेतृत्वाला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा

काही माणसे पदामुळे मोठी होत नाहीत, तर माणसांशी जपलेल्या जिव्हाळ्याच्या नात्यामुळे मोठी होतात. सर्वसामान्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणे, अडचणीच्या वेळी त्यांच्या पाठीशी उभे राहणे आणि समाजासाठी विधायक कार्य उभे करणे, हीच त्यांच्या मोठेपणाची खरी ओळख असते.

आदरणीय वसंतदादा काळे आणि आदरणीय कल्याणराव काळे साहेब यांच्या कार्याकडे पाहताना मला नेहमी हीच भावना जाणवते.

आदरणीय वसंतदादांचा सहवास मला लाभला. शेतकरी, कामगार, युवक आणि सर्वसामान्य माणूस हा त्यांच्या विचारांच्या केंद्रस्थानी होता. लोकांच्या अडचणी समजून घेणे, त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणे आणि शक्य तेवढी मदत करण्यासाठी तत्पर राहणे, ही त्यांची कार्यपद्धती होती. त्यांच्या सहवासातून मिळालेली माणुसकीची शिकवण आजही माझ्यासाठी प्रेरणादायी आहे.

वसंतदादांनी जपलेला विचार आणि समाजसेवेचा वसा आज आदरणीय कल्याणराव काळे साहेब आपल्या कृतीशील कार्यातून समर्थपणे पुढे नेत आहेत. काळ बदलला, समाजाच्या गरजा बदलल्या; मात्र सर्वसामान्य माणसासाठी काम करण्याची भावना कायम आहे.

सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याचा संचालक म्हणून काम करण्याची संधी मला मिळाली. या माध्यमातून कल्याणराव साहेबांचे नेतृत्व, निर्णयक्षमता आणि सहकार क्षेत्राकडे पाहण्याची त्यांची लोकाभिमुख दृष्टी जवळून अनुभवता आली. त्यामुळे त्यांच्या कार्याविषयीचा माझा आदर हा केवळ ऐकलेल्या गोष्टींवर नव्हे, तर प्रत्यक्ष सहवासातून निर्माण झालेला आहे.

सहकार म्हणजे केवळ संस्था चालविणे नव्हे, तर शेतकरी, कामगार, कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबांच्या विश्वासाची जबाबदारी स्वीकारणे होय. हा विश्वास जपत लोकहितासाठी काम करण्याची भूमिका कल्याणराव साहेबांच्या कार्यातून सातत्याने दिसून येते.

शिक्षण, आरोग्य, सहकार आणि रोजगार या विविध क्षेत्रांत संस्था उभ्या करून समाजाच्या गरजा पूर्ण करण्याचा त्यांचा प्रयत्न महत्त्वपूर्ण आहे. आयटीआय कॉलेज, डी.एड. कॉलेज, श्रीराम शिक्षण संस्था, जनकल्याण हॉस्पिटल आणि पतसंस्था यांच्या माध्यमातून युवकांना शिक्षण व कौशल्याची दिशा, सर्वसामान्यांना आरोग्यसेवेचा आधार आणि आर्थिक व्यवहारांना बळ देण्याचे कार्य सुरू आहे.

वसंतदादांनी ज्या विचारांची बीजे पेरली, त्या विचारांना कल्याणराव साहेबांनी कृतीची जोड दिली आहे. त्यामुळे हा वारसा केवळ नावापुरता पुढे चाललेला नाही, तर नव्या काळाच्या गरजेनुसार अधिक व्यापक आणि समाजाभिमुख होत आहे.

विचारांची श्रीमंती, माणुसकीची उब आणि कृतीची ताकद यांचा सुंदर संगम म्हणजे आदरणीय कल्याणरावकाळेसाहेबांचेनेतृत्व.

आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त मनापासून एवढीच सदिच्छा-

आदरणीय वसंतदादांनी जपलेला समाजसेवेचा विचार आणि माणुसकीचा वसा आपल्या कार्यातून असाच अधिक व्यापक होत राहो. शेतकरी, कामगार, युवक आणि सर्वसामान्य माणसासाठी आपल्या हातून अशीच विधायक कामे घडत राहोत. आपल्याला उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि समाजासाठी कार्य करण्याची अखंड ऊर्जा लाभो. आपल्या कार्यातून असंख्य माणसांच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडत राहो, हीच पांडुरंगाच्या चरणी प्रार्थना.

आदरणीय कल्याणराव काळे साहेब, आपणास वाढदिवसाच्या मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!

आपला स्नेह आणि मार्गदर्शन यापुढेही असेच लाभत राहो, हीच मनापासून अपेक्षा.

श्री. नागेश एकनाथ फाटे
संचालक, सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखाना, भाळवणी.

सर्वांना विश्वासात घेऊनच पंढरपूरचा विकास

आराखडा निश्चित करणार -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई, दि. २७ : पंढरपूरच्या विकास आराखड्यात वारकरी, भाविक, स्थानिक नागरिक, व्यापारी, मठाधिपती तसेच लोकप्रतिनिधींच्या सूचना आणि मागण्यांचा समावेश करून सर्वांना विश्वासात घेतच आराखडा अंतिम करण्यात येईल. पंढरपूरचा विकास हा पुढील ५० वर्षांचा विचार करून भाविकांच्या सोयी-सुविधांसह स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देण्याच्या उद्देशाने केला जात आहे, दरवर्षी पंढरपूरला येणाऱ्या भाविकांची संख्या वाढत असल्याने संपूर्ण शहराचा एकात्मिक आणि दीर्घकालीन विचार करून नियोजन करणे आवश्यक असल्याचे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले.

सह्याद्री अतिथीगृह येथे पंढरपूर तिर्थक्षेत्र विकास आराखडा बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, आमदार समाधान आवताडे, जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, नागपूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, सोलापूरचे जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, पंढरपूरचे उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, पंढरपूर मंदिर समितीचे उपजिल्हाधिकारी तथा व्यवस्थापक राजेंद्र शेळके, सोलापूरचे उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख, सोलापूरचे विधी अधिकारी राजेश अंदाने, पंढरपूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी महेश रोकडे,पंढरपूर तीर्थक्षेत्र बचाव समितीचे वीर रामकृष्ण महाराज, अभयराजे इंचगांवकर कुलकर्णी, व्यंकटेश नारायण कुलकर्णी, मुकुंद बडवे, वैभव बडवे, गणेश लंके, डॉ. प्राजक्ता बेणारे,चैतन्य बारसोडे, दर्शन महाजन बडवे, मनोजकुमार रामकिसन राठी आणि संजय आवताडे यासह इतर अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून गर्दीचे नियोजन

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पंढरपूरमध्ये भाविकांची वाढती संख्या लक्षात घेता भविष्यातील गर्दीचे व्यवस्थापन अत्यंत शास्त्रशुद्ध पद्धतीने करणे आवश्यक आहे. त्यासाठी पारंपरिक पद्धतींबरोबरच आधुनिक तंत्रज्ञान आणि विविध डिजिटल टूल्सचा वापर करण्यात येईल. भाविकांना सुरक्षित, सुलभ आणि सुरळीत दर्शन व प्रवासाची सुविधा मिळावी, यासाठी एकात्मिक नियोजनावर भर दिला जाईल. हा विकास आराखडा केवळ शासनाला काहीतरी करायचे आहे म्हणून लादला जाणार नाही. पंढरपूरचे नागरिक आणि येथे येणारे लाखो भाविक यांच्या हिताचा विचार करूनच तो तयार केला जात आहे. स्थानिक नागरिक, आर्किटेक्ट्स आणि लोकप्रतिनिधींनी मांडलेल्या सूचनांचा विचार करून आणि त्यातील शक्य त्या सर्व चांगल्या बाबी आराखड्यात समाविष्ट कराव्यात, असे निर्देश त्यांनी दिले.

मंदिर-मठांना सुरक्षित ठेवून विकास

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, पंढरपूरमधील जुनी मंदिरे आणि मठ यांचे धार्मिक व ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेऊन त्यांना आहे त्याच ठिकाणी ठेवून त्यांचा विकास केला जाईल. कोणतेही मंदिर किंवा मठ स्थलांतरित केले जाणार नाही. बाधितांचे योग्य पुनर्वसन करून 'जागेस जागा' देण्याचे शासनाचे धोरण आहे.विकास आराखड्यामुळे बाधित होणारे दुकानदार, रहिवासी आणि इतर व्यावसायिक यांच्या पुनर्वसनाला शासनाचे सर्वोच्च प्राधान्य राहील. पूर्वीच्या अनुभवांमुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेला अविश्वास दूर करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. बाधित दुकानदारांना पर्यायी दुकाने, तर बाधित होणाऱ्या ५०० हून अधिक घरांतील नागरिकांना योग्य पर्याय उपलब्ध करून देत नियोजन केले आहे. पंढरपूरमधील जमीन व मालमत्ता अधिग्रहणासाठी देण्यात येणारा मोबदला हा थेट मुंबईतील दरांच्या धर्तीवर देण्यात आला आहे. संपूर्ण भारतात एवढा मोठा मोबदला अन्यत्र दिला गेला नसावा, असेही ते म्हणाले.

पंढरपूरच्या भविष्यातील अर्थव्यवस्थेलाही चालना

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, धार्मिक स्थळांचा नियोजनबद्ध विकास झाल्यास भाविकांची संख्या वाढते आणि त्याचा थेट सकारात्मक परिणाम स्थानिक अर्थव्यवस्थेवर होतो. त्यामुळे पंढरपूरच्या विकासाकडे केवळ पायाभूत सुविधांचा विषय म्हणून न पाहता भविष्यातील आर्थिक विकासाच्या दृष्टीनेही पाहणे आवश्यक आहे. पुढील अनेक दशकांचा विचार करून पंढरपूर अधिक सक्षम, सुरक्षित आणि भाविकांसाठी सुलभ बनविण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. विकासाच्या प्रक्रियेत काही उणिवा राहिल्यास सूचना कराव्यात. सर्व घटकांनी परस्पर समन्वयातून काम करून पंढरपूरच्या विकासासाठी सर्वोत्तम मार्ग काढावा,अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. सर्वांना सोबत घेऊन पंढरपूरचा सर्वांगीण, सुरक्षित आणि दीर्घकालीन विकास करण्याची शासनाची भूमिका असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

पंढरपूर तीर्थक्षेत्र बचाव समितीचे अभयराजे इंचगांवकर कुलकर्णी, व्यंकटेश नारायण कुलकर्णी, वीर रामकृष्ण महाराज, मुकुंद बडवे, बैभव बडवे, गणेश लंके, डॉ. प्राजक्ता बेणारे, चैतन्य बारसोडे, दर्शन महाजन बडवे, मनोजकुमार रामकिसन राठी आणि संजय आवताडे यांनी आपली मते व्यक्त केली.

आदरणीय सुशीलकुमार शिंदे साहेब : प्रेरणादायी नेतृत्वाला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

महाराष्ट्राच्या आणि देशाच्या सार्वजनिक जीवनात आपल्या कर्तृत्वाने वेगळी ओळख निर्माण करणारे आदरणीय सुशीलकुमार शिंदे साहेब हे अनुभवी, संयमी आणि सर्वसामान्य जनतेशी घट्ट नाळ जोडून ठेवणारे नेतृत्व आहे. सार्वजनिक जीवनातील त्यांचा प्रदीर्घ अनुभव, कार्यकर्त्यांशी असलेली आपुलकी आणि सर्वांना सोबत घेऊन पुढे जाण्याची भूमिका ही अनेकांसाठी प्रेरणादायी आहे.

माझ्या राजकीय व सामाजिक वाटचालीत आदरणीय सुशीलकुमार शिंदे साहेबांच्या सानिध्यात काम करण्याची संधी मिळणे, हा माझ्यासाठी अत्यंत अभिमानाचा आणि महत्त्वपूर्ण अनुभव आहे. त्यांच्या सहवासात काम करत असताना मला काँग्रेस सेवादलाचे तालुकाध्यक्ष, जिल्हा काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस, तसेच काँग्रेस सेवादलाचे जिल्हाध्यक्ष म्हणून जबाबदाऱ्या सांभाळण्याची संधी मिळाली. या प्रवासात संघटन मजबूत करण्याचे महत्त्व, कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन काम करण्याची पद्धत आणि सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांशी जोडलेले राहण्याची प्रेरणा मला मिळाली. तालुका आणि जिल्हा स्तरावर काम करताना विविध कार्यकर्ते, पदाधिकारी आणि समाजातील अनेक घटकांशी जोडले जाण्याची संधी मिळाली. हा अनुभव माझ्या सार्वजनिक जीवनातील अमूल्य शिदोरी ठरला आहे.

आदरणीय शिंदे साहेबांच्या नेतृत्वातील साधेपण आणि कार्यकर्त्यांबद्दलची आत्मीयता ही विशेष प्रेरणादायी आहे. मोठ्या जबाबदाऱ्या सांभाळतानाही सर्वसामान्य माणसाशी असलेला संवाद आणि जनतेच्या प्रश्नांप्रती असलेली संवेदनशीलता ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची महत्त्वाची ओळख आहे.

त्यांच्या सानिध्यातून मला सार्वजनिक जीवनाकडे केवळ पद किंवा प्रतिष्ठेच्या दृष्टीने न पाहता, जनसेवा आणि समाजहितासाठी प्रामाणिकपणे कार्य करण्याचे महत्त्व समजले. संवाद, संयम आणि सर्वांना सोबत घेऊन पुढे जाण्याची वृत्ती हीच सार्वजनिक जीवनाची खरी ताकद असल्याची शिकवण या प्रवासातून मिळाली.

आज आदरणीय सुशीलकुमार शिंदे साहेबांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्याबद्दल मनात असलेला आदर आणि कृतज्ञता व्यक्त करताना मनापासून शुभेच्छा देऊ इच्छितो.

९ आदरणीय सुशीलकुमार शिंदे साहेबांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा! ₹९ आपणास उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य, सुख, समाधान आणि निरंतर यश लाभो. आपले अनुभवी नेतृत्व आणि मार्गदर्शन आम्हा सर्वांना सदैव प्रेरणा देत राहो, हीच ईश्वरचरणी मनःपूर्वक प्रार्थना! वाढदिवसाच्या कोटी कोटी हार्दिक शुभेच्छा!

- नागेश एकनाथ फाटे

देशाचे माजी केंद्रीय गृहमंत्री
तथा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री
मा.सुशीलकुमार शिंदे साहेब
आपणास वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा!
नागेश फाटे
प्रदेशाध्यक्ष
उद्योग व व्यापार विभाग,
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
शरदचंद्र पवार, महाराष्ट्र राज्य,
सातारा जिल्हा निरीक्षक
/Nagesh Phate /nageshphate7707 /Nagesh Phate /Nageshphate7699
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
शरदचंद्र पवार

माजी विधानपरिषद
सदस्य, नेते
श्री.प्रशांत परिचारक
आपणास वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक : श्री.नागेश एकनाथ फाटे